बाजार भरणाऱ्या करताव्याच्या ठिकाणी अनेकविधी व्यवसाय करणारे व्यावसायिक दिसून येतात.

## 2. शिवकालीन उद्योग व्यवसाय

भारतात शेती बरोबरच अनेक प्रकारचे उद्योगधंदे प्राचीन काळापासून चालत आले होते. आर्थिकदृष्ट्या देश स्वयंपूर्ण होता त्यामुळे फारशी

Scanned by CamScanner

आयात निर्यात करावी लागत नव्हती शिवकाळ्यखंडामध्ये कापड, धातु, मीठ मत्स्य व लाकूड कामावर आधारित उद्योग भरभराटीस आले होते.

1) काापड उद्योग :

भारतातील कापड व्यवसाय हा सर्वात जुना व्यवसाय आहे कापड उद्योगात सुती कापड रेशमी कापड लोकरी कापड तागा व धायपायलापासून कापड तयार होत असे कापड तयार करण्याची पद्धत ही परंपरागत स्वरुपाची होती. शेतामध्ये कापसाचे पीक घेतले जाई कापसाची छोटी झाडे असत यामध्ये झाडावरील कापूस काढून त्यातील बिया बाजूला करणे कापूस स्वच्छ करणे चरख्यावर धागे व धाग्यापासून कापड विणणे त्यानंतर चुना लिंबू व साबणाच्या मिश्रणाने कापड धुतले जाई व यानंतर रंग देऊन कापड तयार होई.

2) धातु उद्योग :

लोखंड तांबे पितळ या धातुपासून अनेकविधी प्रकारच्या वस्तु बिनवल्या जात असत लोखंडापासून शेतीची अवजारे लष्करी साहित्य शस्त्रे कुलपे तोफा बनविल्या जात असत लोखंडपासून शेतीची अवजारे, लष्करी, साहित्य, शस्त्रे तोफा बनविल्या जात.

3) मीठ उद्योग :-

मीठ व मच्छीमारी हे कोकण किनाऱ्यावरील दोन मोठे उद्योग होते. भीतागरामध्ये

मीठ तयार करण्यात येई समुद्र किनारपट्टीवरील हा महत्वाचा उद्योग होय. रत्नागिरी, ठाणे, कुलाबा, पेण, पनवेल, नागोठाणे, कल्याण, भिवंडी या ठिकाणी मोठी मिठागरे होती. येथे तयार होणाऱ्या मिठास मोठी मागणी होती.

३) मत्स्यउद्योग :
मच्छिमारी हा कोकण किनारपट्टीवरील महत्वपूर्ण उद्योग होय. समुद्रकिनाऱ्याबरोबर खाडी, नद्या, तलाव इत्यादी ठिकाणी मत्स्यउद्योग चालत असे. मत्स्योद्योग चालत असे. मत्स्यउद्योग कोळी लोक करत असत. रोह, पेण, पनवेल, नागोठाणे, कल्याण, भिवंडी इत्यादी ठिकाणी मत्स्यउद्योग भरभराटीस आला होता.

४) जहाजबांधणी :
कोकणातील जहाजबांधणी व लाकूडकाम हा एक मोठा उद्योग होय. कोकणात सागाचे सागर लाकूड मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. अमात्य म्हणतात, ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र या धोरणानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले आरमार बळ सुसज्ज केले. महाराजांच्या आरमारात गुराब, गुलबत, पाल, शिबाड, तारू, तराडे, मचवा, तिरकाटी इ. प्रकारची जहाजे होती.

सारांश
शिवकाळात शेती हाच जीवनाचा प्रमुख मार्ग होता. मिराजदार हे जमिनीचे मालक होते. तर उपरे हे खंडाने शेती करत असत. शेतजमीन इनामाच्या स्वरूपातही दिली जात होती. गावातील कारागीर वर्ग शेतकऱ्यांना आवश्यक त्या सेवा